**वस्त्रोद्योग प्रकल्पांना व्याज अनुदानाऐवजी भांडवली अनुदान व स्व-अर्थसहाय्यित प्रकल्पांना भांडवली अनुदान योजना- मार्गदर्शक सुचना,**

**(शासन निर्णय : सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग क्रमांक धोरण २०१९/प्र.क्र.१/टेक्स-५, दिनांक १६.०१.२०१९)**

**स्पष्टीकरण**

| No | मुद्दा | शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक | स्पष्टीकरण |
|---|---|---|---|
| 1 | Multiple Segments selection | Form -A & Form-A-1 Under Para - 6 (1) | Form-A & Form- A-1 मध्ये मल्टीपल सेगमेंट निवड करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. |
| 2 | Admissibility of Additional Subsidy to Textile Projects with Forward / Backward Integration | Sr. No. 4 in Table 1 & 2 Under Para- 1 | १) एखाद्या नविन प्रकल्पाने दोन किंवा त्यापेक्षा जास्त प्रक्रिया प्रकल्प एकत्र सुरू केले असल्यास, त्यापैकी कुठल्याही एका प्रक्रीयेकरीता ५ टक्के अतिरीक्त अनुदान लागू राहील.<br>२) अस्तित्वातील प्रकल्पाने एक पुढील व एक मागील नविन प्रक्रीया प्रकल्प स्थापन केल्यास, कुठल्याही एका प्रक्रीयेकरीता ५ टक्के अतिरीक्त अनुदान लागू राहील.<br>३) अस्तित्वातील प्रकल्पाने पुढील किंवा मागील एकच प्रक्रीया प्रकल्प स्थापन केल्यास, नविन प्रक्रियेस ५ टक्के अतिरीक्त अनुदान लागू राहील. |
| 3 | What is Industry Department Approval No. | Sr. No. 7 in Form - A & Form – A-1 Under Para - 6 (1) | जे वस्त्रोद्योग प्रकल्प मेगा प्रोजेक्ट या सदरात मोडतात अशा प्रकल्पांना राज्याच्या उद्योग विभागाकडून मान्यता देण्यात येते, अशा प्रकल्पाने या मुद्द्यासमोर माहिती नमूद करणे आवश्यक आहे. मात्र जे प्रकल्प मेगा प्रकल्प या सदरात मोडत नाहीत, अशा प्रकल्पांना या मुद्द्यासमोर माहिती देणे बंधनकारक नाही. |
| | Explain about following points in Form-A<br>31. Total Project Cost<br>32. Out of project cost Term Loan sanctioned by bank.<br>33. Out of Term Loan sanctioned cost of the purchase | Sr. No. 31,32,33,34,35 in Form -A Under Para - 6 (1) | <u>फार्म-अ मधील</u><br>मुद्दा क्र.३१ – Total Project Cost – प्रकल्पाची यंत्रसामुग्री + जमीन + बांधकाम यासह अर्थसहाय्य करणाऱ्या किंवा प्रकल्पाचे मुल्यांकन करणाऱ्या वित्तीय संस्थेने विचारात घेतलेली एकुण प्रकल्प किंमत<br>मुद्दा क्र.३२ – Out of project cost Term Loan sanctioned by bank एकुण प्रकल्प किंमतीपैकी बँकेकडून घेतलेले अर्थसहाय्य (कर्ज)<br>मुद्दा क्र.३३ – Out of Term Loan sanctioned cost of the purchase of machinery eligible under TUFS |

| No | मुद्दा | शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक | स्पष्टीकरण |
|---|---|---|---|
| | of machinery eligible under TUFS.<br>34. Out of project cost self-finance Investment Amount.<br>35. Out of self-finance amount of machinery cost eligible under TUFS | | – बँकेकडून घेतलेल्या एकुण कर्जापैकी TUFS अंतर्गत पात्र यंत्रसामुग्रीच्या खरेदीसाठी खर्च केलेली रक्कम.<br>मुद्दा क्र.३४ – Out of project cost self-finance Investment Amount – एकुण प्रकल्प किंमतीमध्ये प्रकल्पाने स्व:त गुंतवणूक केलेली रक्कम (स्व–अर्थसहाय्य)<br>मुद्दा क्र.३५ – Out of self-finance amount of machinery cost eligible under TUFS – प्रकल्पाने स्व:त गुंतवणूक (स्व–अर्थसहाय्य) केलेल्या रकमेपैकी TUFS अंतर्गत पात्र यंत्रसामुग्रीच्या खरेदीसाठी खर्च केलेली रक्कम.<br>(येथे TUFS अंतर्गत एकूण पात्र यंत्रसामुग्रीवरील गुंतवणूकीची रक्कमेचे विभाजन प्रकल्पाची कर्ज रक्कम व स्व–भांडवल यांच्या गुणोत्तर प्रमाणात नमूद करावी.) |
| 4 | Document upload Limit in Form-C, Form C-1, Form C-2, Form C-3 | Sr. No. 7 in Form-C, Form C-1, Form C-2, Form C-3 Under Para - 6 | Form-C, Form C-1, Form C-2, Form C-३ यामध्ये कागदपत्रे अपलोड करण्यासाठी खालील सूचना विचारात घ्याव्यात.<br>१. मुलभूत प्रमाणपत्र जसे नोंदणी प्रमाणपत्रे, जमिनीची कागदपत्रे, ॲग्रीमेंटच्या प्रती ही सर्व कागदपत्रे मुळ स्वरुपात अपलोड करणे आवश्यक राहील.<br>२. प्लांट उभारण्यासाठी खरेदी करण्यात येणाऱ्या मशिनरीची ईन्वाईस संख्या ही ५ पेक्षा जास्त असल्यास अशी सर्व ईन्वाईसची यादी ईन्वाईसचे स्टेटमेंट करून Chartered Accountant / Chartered Engineer यांच्याकडून प्रमाणित करुन ते स्टेटमेंट वेबसाईटवर अपलोड करावे.<br>३. बँक तसेच वस्त्रोद्योग विभाग यांना आवश्यक तेव्हा तपासणीसाठी ही कागदपत्रे मुळ स्वरुपात उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी वस्त्रोद्योग प्रकल्पाची राहील. |

| No | मुद्दा | शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक | स्पष्टीकरण |
|---|---|---|---|
| 5 | Under consortium finance it is not clear who will arrive at the eligibility of individual member Bank? | | १. Consortium Loan मध्ये एका पेक्षा जास्त बँका असल्यास संबंधित सर्व बँका त्यांनी दिलेल्या कर्जाबाबत स्वतंत्रपणे अर्ज करण्यास जबाबदार राहतील.<br>२. Consortium Loan मध्ये जितक्या बँकां असतील त्या-त्या बँकांनी त्यांच्या कर्जावरील पात्र भांडवली अनुदानासाठी Form-A व C मध्ये माहिती नमूद करुन अनुदानाचे क्लेम सादर करावेत.<br>3. Consortium Loan मध्ये मोठ्या कर्जाचा सहभाग असलेली बँक ही लीड बँक या भुमिकेत काम करते. त्यामुळे या योजनेखाली अनुदानाची मागणी करताना, अन्य सहभागी बँकांच्या कर्ज सहभागाच्या प्रमाणात अनुदानासाठी पात्र रक्कमा निर्धारित करून देण्याची जबाबदारी, लीड बँकेची राहील. |
| 6 | A-TUFS eligibility As per A- TUFS Scheme joint inspection team formed by Textile Ministry of GoI will arrive at the Tufs eligible amount of term loan, Whether the same will be applicable in case State subsidy. | | १. केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग योजनेतंर्गत TUFS अंतर्गत पात्र यंत्रसामग्री ठरवण्यासाठी वस्त्रोद्योग आयुक्तालय व बँक यांच्या Joint inspection मध्ये अनुदानपात्र रक्कम निर्धारित केली जाते. त्याच धर्तीवर राज्य शासनाच्या योजने अंतर्गत वस्त्रोद्योग प्रकल्पाची पात्रता / प्रकल्प सुरू आहे किंवा कसे तसेच अन्य बाबीची तपासणी करण्याची जबाबदारी ही अर्थसहाय्य देणाऱ्या बँकेमार्फत निश्चित करण्यात आली आहे.<br>२. स्वअर्थसहाय्यित प्रकल्पाच्या बाबतीत अनुदानपात्र रक्कम निर्धारित करण्याची जबाबदारी मुल्यांकन करणाऱ्या बँक/वित्तीय संस्था यांच्यावर आहे.<br>३. वस्त्रोद्योग विभागाला आवश्यक वाटेल तेव्हा अशा वस्त्रोद्योगाची अचानक तपासणी करण्याचे अधिकार संचालक (वस्त्रोद्योग) यांच्याकडे आहेत. |
| 7 | Is it necessary for unit registered under Textile Ministry List | | राज्य शासनाच्या अनुदान योजनेतंर्गत अनुदानाचे दावे सादर करताना फार्म-अ मध्ये केंद्र शासनाकडून सदर प्रकल्प नोंदणीकृत आहे किंवा कसे याबाबत कोणतीही माहीती नमुद करण्याचे बंधनकारक करण्यात आले नाही. त्यामुळे केंद्र शासनाच्या A-TUFS खाली एखादा वस्त्रोद्योग प्रकल्प नोंदणीकृत असणे किंवा नसणे हे राज्य शासनाच्या योजनेसाठी अडचणीचे ठरणार नाही. मात्र एखादा प्रकल्प केंद्र शासनाने TUFS च्या योजनेखाली अपात्र ठरविला असल्यास असा प्रकल्प राज्य शासनाच्या या योजनेसाठी पात्र ठरणार नाही. |

| No | मुद्दा | शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक | स्पष्टीकरण |
|---|---|---|---|
| 8 | Cap for subsidy amount. | | राज्य शासनाच्या वस्त्रोद्योग धोरणात वस्त्रोद्योग प्रकल्पाची गुंतवणूकीची कमाल मर्यादा निश्चित करण्यात आलेली नाही. त्यामुळे एखाद्या वस्त्रोद्योगाने कितीही मोठया रकमेची गुंतवणूक केली व त्यावर पात्र यंत्रसामुग्रीसाठी भांडवली अनुदानाची मागणी केल्यास त्यासाठी कोणतीही कमाल मर्यादा निश्चित करण्यात आलेली नाही. |